महामंडलेश्वर

**स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे**

**सत्संग - प्रवचन**

# जन्म-मृत्यू चक्र निवृत्ती



***(प्रथम आवृत्ती)***


- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दूरध्वनी :

किंमत : पाच रुपये (५/-)


## निवेदन

जीव विशेषतः मानव प्राणि जन्म-मृत्यूच्या चक्रामुळे भयभित आहे. याचे कारन जीवन कसे जगावे, कसे जीवन जगून कसे मरावे हे बरेच जण जाणत नाही. त्यामुळे जीव मृत्यूच्या भयाने भयभित राहतात. जीवन जगावे कसे म्हणजे जिवंत राहावे कसे, हे तर पशूपक्षी देखील जाणतात. परंतु मरावे कसे हे केवळ ज्ञानी जाणतात.

म्हणून असेच एक ज्ञानी महापुरुष जीवनमुक्त संत श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्या सात दिवसांच्या सत्संग प्रवचनातून साधकांना मुमुक्षूना जीवन जगावे कसे व मरावे कसे याचा बोध प्राप्त होतो.

सात दिंवसांचे जे अनुष्ठान असते व सात दिवस जे सत्संग प्रवचन होते त्यापैकी पहिल्या दिवसाचे ब्रह्ममुहूर्तातील सत्संग प्रवचन लिखित स्वरूपात आपल्या हातात देतांना आम्हास धन्यता वाटत आहे.

**प्रकाशक**

**उपजला प्राणी न राहे संसारी । बैसला शेजारी काळ उसा ।।१।।**

**पहा तो उंदिर घेऊनी जाये बोका । तैसा काळ लोका नेत असे ।।२।।**

**खाटिकाचे घरी अजापुत्र पाहे । कसायाची गाय वाचे कैसी ।।३।।**

**तुका म्हणे काही करा काढा काढी । जाती ऐसी घडी पुन्हा नये ।।४।।**

◆ ◆ ◆ ◆ ◆

**उपजला प्राणी न राहे संसारी**

या जगामध्ये बरेचसे असे सिद्धांत आहे की, ते कधी टळत नाही. कारन सिद्धांत हे अटळ असतात. जसा काकभुशुंडी ने गरुडाला एक सिद्धांत सांगितला तो म्हणजे...

**बारिमथे घृत होई बरु सिकता ते बरु तेल ।**

**बिनु हरि भजन न भव तरिय यह सिद्धांत अपैल ।।**

पाण्याचे मंथन केल्यानंतर कदाचित त्या पाण्यापासून तूप निघेल किंवा वाळू घाण्यात पिळली किंवा जात्यात दळली तर त्या वाळूपासून कदाचित तेल निघेल. परंतु जोपर्यंत जीव ईश्वराची भक्ती करत नाही तोपर्यंत जीव भवसागरापासून तरू शकत नाही. म्हणजेच भक्तीशिवाय भवसागरापासून तरणोपायाचा कोणताही मार्ग नाही. काकभुशुंडीने जसा भक्तीच्या संदर्भात सिद्धांत सांगितला त्याच प्रमाणे नामदेव महाराज देखील म्हणतात.

**भक्तिविने मोक्ष नव्हे हा सिद्धांत । वेद बोले हात उभारुनी ।।**

वेदांनी हात उभारून म्हणजेच प्रतिज्ञापूर्वक सांगितले की, भक्तीशिवाय जीवाची जन्म-मृत्यूच्या चक्रापासून मुक्ती नाही.

काकभुशुंडी व संत नामदेव महाराजांनी जसा सिद्धांत सांगितला तसाच भगवान श्रीकृष्ण देखील गितेमध्ये एक सिद्धांत सांगतात की...

**''जातस्य हि ध्रुवो मृत्युः''** ज्याचा जन्म झाला त्याचा मृत्यू निश्चीत आहे. जन्माला आलेला प्राणी कोणत्या तरी निमित्ताने एक दिवस जाणारच



आहे. भगवान श्रीकृष्णाने जो संस्कृतभाषेमध्ये मृत्यूच्या संदर्भात सिद्धांत सांगितला तोच साध्या सोप्या भाषेमध्ये तुकाराम महाराज आपल्याला एक सिद्धांत सांगतात. तो सिद्धांत म्हणजे.

**'' उपजला प्राणि न राहे संसारी ''** जो प्राणि उपजला म्हणजेच जन्माला आला तो या जगात नेहमी राहत नाही. इतर प्राणि नेहमी जिवंत राहत नाही त्याचप्रमाणे मनुष्य प्राणि देखील नेहमी जिवंत राहू शकत नाही. हा सिद्धांत व्यवस्थित समजावा म्हणून ते म्हणतात. **'' बैसला शेजारी काळ उसा ''** काळ अगदी जवळ उशालाच बसलेला आहे. जसे हात-पाय तूटल्यानंतर जीवाची वाचण्याची शक्यता असते, परंतु मुंडके तुटल्यानंतर वाचू शकत नाही. त्यासाठी काळ अगदी जवळ रात्रंदिवस उशालाच बसलेला आहे. उशाला बसून काय करतो तर संत एकनाथ महाराज म्हणतात...

**घडी घडी काळ वाट याची पाहे । अजून किती आहे आवकाश।।**

घडी घडी काळ हेच पाहत राहतो की, याचे आयुष्य अजून शिल्लक किती आहे. नेण्यासाठी अजून किती अवकाश आहे, व तेवढी घडी भरली की काळ जीवाला घेऊन जातो. कसा घेऊन जातो? हे समजण्यासाठी अभगांच्या दुसऱ्या चरणामध्ये संत तुकाराम महाराज म्हणतात...

**पहा तो उंदिर घेऊनी जाये बोका । तैसा काळ लोका नेत असे ।।**

जसा बोका म्हणजे मांजर उंदराला नेते. त्याप्रमाणे काळ जीवाला नेतो. सर्वांनाच समजेल अस साधे सोपे उदाहरण दिले. कारण उंदिर आणि मांजर सर्वत्र असतातच. हे उदाहरण सर्वांनाच समजू शकते. जसे मांजर नेहमी उंदराच्या शोधात असते. तसा काळ जीवाच्या शोधात असतो. जस मांजर संधी शोधत राहते तसा काळ संधी शोधत राहतो. मांजर उंदराला धरतांना दिवस - रात्र, शुभदिवस - अशुभ दिवस, लहान - मोठा, नर - मादी काहीच पाहत नाही. सर्वांनाच मांजर जसं धरतं तसेच काळ दिवस - रात्र, शुभदिवस - अशुभ दिवस, लहान -

मोठा, स्त्री - पुरुष किंवा गर्भवती काहीच पाहत नाही. काळ सर्वांनाच नेतो. हे उदाहरण ऐकल्यानंतर कदाचित काही म्हणतील उंदराचं रक्षण करणार कुणी नसतं म्हणून मांजर त्याला धरते. परंतु आमचे तर रक्षण करणारे आमचे नातेवाईक आहे, तेव्हा आम्हाला काळ कसा काय नेईल? यासाठी दुसर उदाहरण दिल की,

**खाटिकाचे घरी अजापुत्र पाहे । कसायाची गाय वाचे कैसी।।**

खाटीक अजापुत्राला म्हणजेच बोकड्याला चारा पाणी देतो. त्याच प्रमाणे कसाई देखील गाईला चारा पाणी देतो. परंतु खाटकाचा बोकड व कसायाची गाय जसी वाचत नाही. त्याच प्रमाणे कुणाचे रक्षणकर्ते असो किंवा नसो मृत्यू सर्वांचाच होतो. हे सर्व ऐकल्यानंतर कदाचित काही म्हणतील की, सर्वांचाच मृत्यू होतो. आपण सर्व मरणार आहोत हे सर्वांनाच माहीत असतांना हे सर्व सांगण्याचे प्रयोजन काय? हे सर्व सांगण्याचे प्रयोजन हे आहे की, प्रत्येकाच्या मरण्यामध्ये किंवा जाण्यामध्ये खूप मोठे अंतर असते.ते अंतर आपण जाणून घेतले पाहिजे. जसे कबीर महाराज म्हणतात...

**आए है सो जायेंगे राजा रंक फकिर ।**
**ऐक सिंघासन चढि चले एक बांधे जात जंजीर ।।**

जे जन्माला आले ते सर्व जाणार आहे. तो राजा असो, भिकारी असो की, फकीर म्हणजे साधूसंत असो सर्वांना जावेच लागणार आहे. परंतु त्यांच्या जाण्यामध्ये खूप मोठे अंतर आहे. म्हणजे एक शुभकर्म करून शुभगतीला मोक्षाला जातो. दुसरा एखादा वाईट कर्म करून नरकाला किंवा चौऱ्याशिंच्या फेऱ्याला जातो.

जसे या जगामध्ये काही पापी लोक खून करतात, दरोडे घालतात, अन्याय अत्याचार करतात, त्यांना नेण्यासाठी पोलीस येतात. अशा पापी लोकांना पोलीस घेऊन जातात व न्यायधिशासमोर उभे करून गुन्हा सिद्ध झाल्यानंतर त्या पाप्याला जेलमध्ये बंद करून नरकप्राय यातना देतात.



जे पाप कर्म करतात त्यांनाच पोलीस नेण्यासाठी येतात असे नाही तर, जे चांगले कर्म करतात त्यांना देखील पोलीस नेतात. जसे एखाद्या व्यक्तीने चांगले सर्व जनहिताय सर्व जनसुखाय कार्य केले असेल व जर तो मंत्री झाला असेल तर त्यांना देखील पोलीस नेण्यासाठी येतात व घेऊन जातात.

पाप्याला पोलीस नेतात व आपल्या अधीन ठेवून नरकप्राय यातना देतात तर पुण्यवानाला पोलीस नेतात. परंतु पुण्यवाणाच्या अधीन पोलीस राहून त्यांची सेवा करतात.

म्हणून नेतात दोघांनाही परंतु त्यामध्ये जसे अंतर आहे, त्याच प्रमाणे काळ सर्वांना नेतो. परंतु पाप्याला दुःख तर पुण्यवानांना सुख देतो. म्हणून आपनास शुभ गतीला जायचे की, अशुभ गतीला जायचे आपल्या हातात आहे.

आपणास जर शुभ गतीला जायचे असेल तर त्यासाठी ज्ञानी सांगतात...

**रहना बडा हुशियार एक दिन काल आयेगा ।।धृ।।**

हुशियार रहा म्हणजे सावध राहा. आपण सावध राहिले म्हणजे आपल्याला काळ नेणार नाही. मृत्यू येणार नाही असेही नाही. शरीराचा तर मृत्यू निश्चित होईलच. भलेही आपण कितीही उपाय करा जसे

**काल न छोडे कहीपर भाग चहू दिशी जाय ।**
**चाहे भूमी मे धसे चाहे गगन उडाय ।।**

आपन कोणत्याही दिशेला जा, भूमी मध्येलपा की, आकाशामध्ये जा. काळ आपणास सोडणार नाही. मृत्यूझाल्याशिवाय राहणार नाही. त्याच प्रमाणे काळ आपणास नेण्यासाठी ज्या वेळेस येईल त्या वेळेस काही कळणार देखील नाही. जसे...

**प्रबल तीर तलवार न बरछी ना बंदूक चलायेगा ।**
**आवत जावत लखे न कोई घरमे छुम मचायेगा ।।**

काळ येतांनाही कळू देत नाही व जातांनाही कळू देत नाही. येताना व जाताना दिसत नाही. त्याच प्रमाणे धनुष्यबाण, तलवार,

बरछी बंदूक घेऊन येतो असेही नाही. परंतु नेल्यानंतर ज्या वेळेस घरामध्ये रडारड सुरू होते त्या वेळेस कळते की काळ येऊन गेला. आता काही म्हणतील काळ येतांना व जातांना दिसत नाही तर मग मोठ्या बंगल्यात कड्या कुलपा बंद करून राहिले तर. तरिही काहीही त्याचा उपयोग होणार नाही. कारण...

**ताला न तोडे घर ना फोडे ना कोई रुप दिखायेगा ।**
**धन दौलत से कुछ काम नही है तुझको पकड ले जायेगा ।।**

काळ आल्यानंतर कुलप तोडत नाही. घर फोडत नाही. इतरांना काही रूप दिसू देत नाही. त्याचप्रमाणे धन, द्रव्य, संपत्ती घेऊन जा परंतु मला नेऊ नको, असे सांगितले तरी त्याचा काही उपयोग होत नाही. कारण काळ धन, द्रव्य, संपत्ती तसीच पडू देतो. फक्त जीवाला घेऊन जातो. कसे घेऊन जातो तर आत्ताच जसे सांगितले की...

**'' पाहा तो उंदिर घेऊन जाये बोका । तैसा काळ लोका नेत असे ''**

जसे उंदराला मांजर घेऊन जात तसे काळ जीवाला घेऊन जातो. एका उंदराला घेऊन गेल्यानंतर जसे दुसरे उंदिर मांजरीच्या विरोधात काही कुणाकडे तक्रार करू शकत नाही. किंवा इतर उंदिर मांजरापासून उंदराला सोडवू शकत नाही. त्याच प्रमाणे

**दाद नही फरियाद चलेगी तूझे न कोई बचायेगा ।**
**लोग कुंटूब परिवार घनेरे एक भी काम न आयेगा ।।**

आपले कितीही मोठे कुंटुंब असेल त्या कुंटुंबामध्ये कुणी मोठे डॉक्टर, वकील, न्यायाधिश असेल मोठ-मोठे मंत्री असेल तरीही ते आपल्याला काळाच्या तावडीतून सोडवू शकत नाही. किंवा काळाच्या संदर्भात कुणाकडे तक्रार करू शकत नाही. सांगण्याचे तात्पर्य हेच की...

**सुख संपत्ती धन धाम बडाई त्याग सकल तू जायेगा ।**
**ढूंढे पता लगे नही तेरा खोजी खोज न पावेगा ।।**

कितीही लौकीक सुख आपणास मिळत असेल खूप मोठी संपत्ती आणन जमविली असेल, खूप मोठे धन, धाम नगर असेल ते सर्व सोडून



एक दिवस आपणास जावेच लागेल. त्यानंतर आपण कुठे गेलात ते शोधण्याचा कुणी कितीही प्रयास केला तरी आपणास कुणी शोधू शकणार नाही. की, काळाने आपणास कुठे नेले व आता आपन कोणत्या गतीला आहे हे कुणीही शोधू शकणार नाही. एवढे मात्र जरूर आहे की, पशूपक्षाच्या वृक्षाच्या गतीला जाण्यापूर्वी आपनास काळ धर्मराजासमोर उभ करील. ज्या ठिकाणी पाप-पुण्याचा, धर्म-अधर्माचा न्याय केल्या जातो व त्या अनुसार आपनास सद्‌गती किंवा दुर्गती प्राप्त होते. म्हणून संत सांगतात की,

**''रहना बडा हुशियार एक दिन काल आयेगा''** हुशार रहा सावधान रहा ते यासाठी की काळाने आपणास धर्मराजासमोर उभे केल्यानंतर ज्या वेळेस धर्म राजा आपणास विचारील की, तू जगात काय केले? काय केले म्हणजे ज्यासाठी तुला मानवाचा देह दिला होता. त्या मानव देहाचे सार्थक केले किंवा नाही. त्या मानव देहाचे सार्थक कशात आहे हे विचारले तर ज्ञानी सांगतात...

**मनुष्य देहाचेनि साधणे । सच्चिदानंद पदवी घेणे ।**
**एवढा अधिकार नारायणे । कृपालोकानार्थ दिधला असे ।।**

सच्चिदानंद परमात्म्याला जानण्यासाठी ती सच्चिदानंद पदवी घेण्यासाठी आपणास मानवाचा जन्म भगवंताने दिलेला आहे.

**''नर करणी करे तो नारायण बने । नारी करनी करे तो लक्ष्मी बने''।।**

नराचा नारायण व स्त्रीची लक्ष्मी देवी देवता होण्याचा अधिकार भगवंताने आपणास दिलेला आहे. तो अधिकार आपण प्राप्त करून घेतला का? असे धर्मराजा आपणास विचारील. साधूसंताची सेवा करणे, सद्‌गुरुचा बोध घेऊन जप, तप, अनुष्ठान, दान, धर्माचे आचरण करून जिवनाचे सार्थक करून घेतले का? असे धर्मराज आपणास विचारतील तर त्या वेळेस आपण हे केले असेल तर आपणास काही उत्तर देता येईल; अन्यथा...

**धरमराज तेरा लेखा मांगे वहा कछू जाब न आयेगा ।**
**प्रभू गुरु संत की सेवा करी यहा वही वहा तू पायेगा ।।**

भगवंताची, गुरुची, संतांची सेवा हे सर्व सत्कर्म आपण केले असेल तर आपणास उत्तर देता येईल की, हे सर्व मी केले आहे. तसे तर खरे म्हणजे त्या ठिकाणी प्रश्न-उत्तराचे काही काम राहतच नाही. कारण चित्रगुप्त सर्व आपले कर्म जाणतो व त्याप्रमाणे आपल्याला सद्गती किंवा दुर्गती देतो. म्हणून हे ही लक्षात ठेवले पाहिजे की ही कर्मभूमी आहे. त्यामुळे येथे जे कर्म केले असेल, त्याचेच फळ तेथे मिळेल. म्हणून ज्ञानी म्हणतात. ''**प्रभू गुरु संत की सेवा करि यहा वही वहाँ तू पायेगा**'' म्हणून आपण सावधान रहा, हुशार रहा म्हणजे काळ येण्याच्या पूर्वी जेवढे सत्कर्म करणे मानव जिवनासाठी अत्यावश्यक आहे ते सर्व करून घ्या. केव्हा करा तर लगेच सुरुवात करा. कारण...

**निःश्वासे नहि विश्वास कदा रुद्धो भविष्यता ।**
**किर्तनियतो बाल्याद हर्रेर्नामैव केवलम् ।।**

जो श्वास बाहेर गेला तो आत येईलच याचा काहीही भरवसा नाही. म्हणून मी मोठा होईल, लग्न झाल्यानंतर मूलबाळ होतील, नातू-पण्तू घरात आल्यानंतर मी दानधर्म, तीर्थयात्रा, जप, तप, अनुष्ठान करेल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. कारण आत्ताच सांगितले की, जो श्वास बाहेर गेला तो आत येईलच असे नाही. म्हणून बालवयापासूण सत्कर्म भगवंताचे चिंतन, स्मरण केले पाहिजे. हे सर्व करण्यासाठीच तुकाराम महाराज अभंगाच्या शेवटच्या चरणामध्ये उपदेश करतात...

**तुका म्हणे काही करा काढा काढी । जाती ऐसी घडी पुन्हा न ये ।।**

तुकाराम महाराजांनी अभंगाच्या प्रथम चरनामध्ये जो सिद्धांत सांगितला की ''**उपजला प्राणी न राहे संसारी**'' जो जीव जन्माला आला त्याचा मृत्यू निश्चित आहे. हे चांगले समजावे यासाठी सर्वांच्या परिचयाचे उदाहरण दिले की, ''**पहा तो उंदिर घेऊन जाय बोका तैसा काळ लोका नेत असे**'' जसा उंदराला मांजर केव्हाही घेऊन जाते तसे काळ लोकांना



केव्हा घेऊन जाईल याचा काही भरवसा नाही. हे सर्व सांगण्याचा जो उद्देश आहे तो तुकाराम महारांजानी अभगांच्या शेवटच्या चरणामध्ये सांगितले की, ''**तुका म्हणे काही करा काढा काढी । जाती ऐसी घडी पुन्हा नये ।।**'' म्हणजे नेमके काय करा, तर जसा एखादा रोग झाल्यानंतर त्या रोगापासून मुक्त होण्यासाठी डॉक्टर किंवा वैद्य काही औषध किंवा काढा देतात. उद्देश हा असतो की, जीवाचा रोग निवृत्त झाला पाहिजे. यासाठी त्याला काढा करण्याचा, काढा सेवन करण्याचा सल्ला डॉक्टर किंवा वैद्य देतात.

त्याच प्रमाणे या जगात जे जन्माला आले त्या सर्वांना एक रोग असतो. तो म्हणजे '**भवरोग**' भवरोग म्हणजे जन्ममृत्यूचा रोग. जन्म झाला की, त्याचा मृत्यू होतो व मृत्यू झाला की त्याचा परत वासनेमुळे जन्म होतो. ' **जन्म घेणे लागे वासनेच्या संगे** ' अशा प्रकारे जीवाच्या पाठीमागे भयरोग म्हणजेच जन्ममृत्यूचा रोग लागलेला आहे. मृत्यू झाल्यानंतर परत मानवाचा जन्म मिळतो असे नव्हे तर पशुपक्षांचा वृक्षांचा देखील जन्म मिळतो. त्यामुळे जीव दुःखी राहतो. म्हणून या भवदुःखापासून भवरोगापासून मुक्त होण्यासाठी तुकाराम महाराज म्हणतात '' तुका म्हणे काही करा काढा '' काढा करा तो सेवन करा त्याने जन्ममृत्यूपासून म्हणजेच भवरोगापासून आपण मुक्त व्हा. हे ऐकल्यानंतर काहींच्या मनामध्ये कदाचित शंका निर्माण होऊ शकते की असा काढा कसा तयार करायचा? व तो कसा सेवन करायचा? तो काढा नेमका कोणता आहे? तो काढा कोणता आहे, तो देखील तुकाराम महाराजांनी सांगितला की...

**ब्रह्मरस घेई काढा । तेणे पिडा वारेल ।।**
**भवरोगा ऐसे जाय । आणिक काय क्षुल्लके ।।**
**तुका म्हणे नव्हे बाधा । आणिक कदा भुतांची ।।**

ब्रह्मरस, काढा घ्या. तेने सर्व पिडा वारेल म्हणजेच मरेल सर्व पिडा दुःख निवृत्त होऊन जाईल. सर्वात मोठी पिडा किंवा दुःख आत्ताच

सांगितले की, भवरोगाचे म्हणजेच संसाराचे आहे. ते सर्व ब्रह्मरस काढ्याने निवृत्त होते. एवढेच नव्हे तर त्याला भुताची बाधा होत नाही. म्हणजेच पंचमहाभुतापासून तो मुक्त होतो. म्हणून आपणास दुःखापासून, जन्ममृत्यूच्या चक्रापासून ग्रहाच्या, प्रेताच्या, भुताच्या बाधेपासून मुक्त व्हायचे असेल तर त्यासाठी ब्रह्मरस काढा घ्या.

बरेचसे स्त्री, पुरुष विचारतात की, बाबाजी आमच्या घराला काय पिडा लागलेली आहे काही समजत नाही. घरात कशाची कमतरता नाही. खाण्यापिण्याचे सर्व साहित्य आहे, बंगला आहे, गाडी आहे, पैसा आहे, भोग-ऐश्वर्याचे सर्व साधने आहे तरी परंतु घरामध्ये सुख, समाधान, शांतता नाही. कुणी कुणाशी चांगले बोलत नाही, वागत नाही. काय करावे काही समजत नाही. या सर्वांसाठी एकच उपाय तो म्हणजे ''ब्रह्मरस घेई काढा तेणे पिडा निवारेल '' ब्रह्मरस काढा घ्या त्याने सर्व पिडा निवृत्त होईल. असा अनेकांचा अनुभव आहे. आपल्याला देखील तो अनुभव घ्यावयाचा असेल तर आपण देखील तो ब्रह्मरस काढा घ्या. आपण म्हणाल तो ब्रह्मरस काढा कसा असतो? तो कसा सेवन करायचा? याच्यासाठीच तुकाराम महाराज म्हणतात ''तुका म्हणे काही करा काढा काढी '' ब्रह्मसर काढा करून तो सेवन करा परंतु त्यासाठी काही काढी करा. काढी करा म्हणजे संसार प्रपंचातून काही थोडा बहुत वेळ काढा, म्हणजेच तन, मन, धन, संसार प्रपंचातून काढून परमार्थाकडे लावा. सत्संग प्रवचनात बसून तो ब्रह्मरस काढा कसा तयार करायचा, कसा सेवन करायचा व कसे भवरोगापासून मुक्त व्हायचे यासाठीच तर हे सात दिवसांचे अनुष्ठान व त्यानिमित्ताने सकाळ, संध्याकाळ म्हणजेच रात्री जे सत्संग प्रवचन होणार आहे, त्यामध्ये हेच जाणून घ्यावयाचे आहे की, ब्रह्मरस काढा कसा असतो? कसा सेवन करायचा? व कसे भवसागरातून मुक्त व्हायचे? यासाठीच हे जप, तप, अनुष्ठान, सत्संग प्रवचन आहे. त्यासाठीच पुण्यात्मांनी याचे या ठिकाणी आयोजन केलेले आहे. आपल्याला



जेवढे जमेल तेवढे तन, मन, धन काढून या सत्कार्याकडे लावले पाहिजे. परंतु त्यासाठी तुकाराम महाराजांनी जो आपणास सावधानतेचा इशारा दिलेला आहे, तो देखील लक्षात ठेवला पाहिजे. तुकाराम महाराज म्हणतात...

**'' जाती ऐसी घडी पुन्हा नये ''** जी घडी जो वेळ गेला तो परत येत नाही. जीवनामध्ये ज्या संधी मिळतात त्या परत मिळत नाही. जसे नेहमी नेहमी अनुष्ठानाचा, जपाचा तपाचा, दान करण्याचा सत्संग श्रवणाचा लाभ मिळतोच असे नाही. आणि समजा परत हा लाभ मिळालाच तर दुसऱ्या वेळेस त्या सर्वांचा लाभ घेण्यासाठी आपण तनाने, मनाने, धनाने सक्षम असतोच असे नाही. आता गेलेली संधी परत आयुष्यात मिळतेच असे नाही. आणि मिळालीच तर त्या संधीचा लाभ आपण घेऊच असे नाही. कारण चालता, बोलता, खाता, पिता, जीव शरीरातून निघून जातो. आपला मृत्यू होतो. शरीराचा मृत्यू तर एक दिवस होणारच आहे. परंतु त्यापूर्वी जीवनाचे सार्थक करून घेतले पाहिजे. त्यासाठी जप, तप, अनुष्ठान, सत्संग प्रवचन, दान धर्माचा, कथा कीर्तनाचा, भगवंताच्या भक्तीचा लाभ करून घेतला पाहिजे. अशा प्रकारे एखाद्याला समजावण्याचा प्रयत्न केला तर तो म्हणतो आता नाही पुढच्या वेळेस बघू. त्यासाठी संत म्हणतात पुढच्या वेळेस आपणास तो लाभ मिळेलच असे नाही कारण...

**आज कहै मै कल भजू कल कहै फिर कल ।**
**आज काल के करत ही औसर जासी चाल ।।**

आलेली संधी चालल्या जाईल कारण...

**पाव पलक की सुधी नही करै काल का साज ।**
**काल अचानक मारसी ज्यो तीतर को बाज ।।**

जीवाची आज जिवंत राहण्याची खात्री नाही. परंतु उद्याची चिंता जीव करत राहतो. आणि जसा तितर दाणे खाण्यामध्ये मग्न

असतो त्याच वेळेस वरती बाज म्हणजे ससाणा त्या तितराला खाण्यासाठी तयार असतो. तीच अवस्था जीवाची काळ करतो. म्हणून आपण सावध राहिले पाहिजे. सावध झाले पाहिजे. म्हणजे आपणास मृत्यू येणार नाही असे नाही. मृत्यू तर येणारच आहे. कारण सुरूवातीलाच सांगितले की, उपजला प्राणि न राहे संसारी मृत्यू निश्चीत होणार. परंतु मृत्यू कसा आला पाहिजे. तर ज्ञानी सांगतात...

**जीवनमे मरणा भला ज्यो मरि जाने कोय ।**
**मरणा पहिले ज्यो मरे अजर अमर सो होय ।।**

जिवनामध्ये मरण चांगल आहे. परंतु त्यासाठी कसे मरावे ही मरण्याची कला जाणून घेतली पाहिजे. जिवंत राहण्यासाठी तर सर्वच प्रयत्न करतात. परंतु धन्य तो आहे, जो मरण्यासाठी प्रयत्न करतो. मरण्यासाठी म्हणजे आत्महत्येसाठी प्रयत्न करतो, असे नव्हे तर मरणाची कला जो जाणतो तो धन्य आहे. '' माझे मरण पाहिले मी डोळा '' ही अनुभूती घेतली पाहिजे. त्याला म्हणतात मरण पाहिले ज्यो मरे अजर अमर सो होय. तो अजर अमर होतो किंवा...

**मरो मरो सब कोई कहे मरणा न जाने कोय ।**
**एक बार ऐसा मरो की फिर मरणा न होय ।।**

मर किंवा मरा मारा असे तर सर्व म्हणतात. परंतु मरणाची कला सर्वच जाणत नाही. त्यासाठी ''एक बार ऐसा मरो की फिर मरना न होय'' अशी कला जाणून घेण्यासाठी काय करा तर ज्ञानी सांगतात...

**देव विर पशू मृत्यू तीन प्रकार । बीन विचार मुर्ख मरे ज्ञानी मरे विचार ।।**

देवमृत्यू, वीरमृत्यू व पशूमृत्यू असे साधारणतः मृत्यूचे तीन प्रकार आहे. तीन प्रकारापैकी कोणत्या प्रकाराने आपन मरायचे याचा विचार ज्ञानी करतात व त्या प्रमाणे ज्ञानी मृत्यू स्वीकारतात. परंतु कसलाही विचार न करता अज्ञानी मरत राहतात. त्यामुळे ते जन्ममृत्यूच्या चक्रात भ्रमण करत राहतात. म्हणून ज्ञानी ज्या प्रमाणे विचारपूर्वक मृत्यू स्वीकारतात



त्या प्रमाणे मृत्यू स्वीकारला पाहिजे. जसे मृत्यूचे तीन प्रकार सांगितले, पहिला देवमृत्यू दुसरा विरमृत्यू व तिसरा पशूमृत्यू. प्रथमतः देवमृत्यू कशाला म्हणतात व त्याचे फळ काय हे जाणून घेण्याचा प्रयास केला पाहिजे. ज्ञानी म्हणतात.

**देवमृत्यू :-**

**जाण विषय सुख क्षणिक है उपजा जीन्है बैराग ।**
**क्षणभंगुर संसार लख कर गए जौन त्याग ।।**

ज्यांनी जाणले की विषय सुख सर्व क्षणिक आहे, दुःख रुप आहे. त्यामुळे ज्यांच्या मनामध्ये वैराग्य निर्माण झाले त्यामुळे क्षणभंगूर संसाराचा व क्षणिक दुःख रुप विषय सुखाचा त्याग त्यांनी तारुण्यातच केला. व त्यानंतर...

**एक देव महादेवसे जीनका हुआ प्यार ।**
**सदा मस्त है ध्यान मे शुन्य समाधी धार ।।**
**काल कराल के नेम से वे बांधे नही जाय ।**
**ताके शिरपर पाव धर अमर लोक को जाय ।।**

देवांचा देव सर्वाचा एक महादेव त्या भगवंताबद्दल ज्यांच्या मनामध्ये प्रेम उत्पन्न झाले. त्यामुळे त्यांच्या ध्यानात समाधीत जे मग्न झाले असे साधक भक्त, साधू संत, मुमुक्षू काळाचेही काळ महाकाळचे भक्त काळाच्या डोक्यावर पाय देऊन अमर लोकाला जातात की, जेथून पुनरावर्ती नाही. **यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम** असे ज्या धामाचे वर्णन भगवंत गितेत करतात. अशा धामाला गेल्यानंतर परत जन्म मृत्यूच्या चक्रात जीव सापडत नाही. म्हणजे देवमृत्यू ज्याला प्राप्त होतो तो मुक्त होतो.

**विरमृत्यू :-**

**देश जाती की रक्षा हित जो दे सर्वस्व वार ।**
**दीन दुःखी की बाह बन उन्हे उतारे पार ।।**

**सदा धर्म हित जो लढे फल का ध्यान बिसार ।**
**सदा लोक मे यश मिले अंतीम मोक्ष द्वार ।।**

देशासाठी, समाजासाठी म्हणजेच देशहित, समाजहितासाठी जो सर्वस्व तन, मन, धन अर्पण करतो. दिन म्हणजेच गरीब असेल दुःखी असेल त्यांना तनाने, मनाने, धनाने सहयोग देऊन त्यांचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न करतो. कसल्याही फळाची अपेक्षा न ठेवता केवळ सत्य धर्माच्या रक्षणासाठी लढतो व धर्माचे रक्षण करतो. त्यामुळे त्याला या जगात यश मिळते व मृत्यूनंतर मोक्ष मिळतो. म्हणजेच खऱ्या शाश्वत धर्म रक्षणासाठी जो लढतो तो मोक्षाला जातो मुक्त होतो.

**पशुमृत्यू :-**

**कामी क्रोधी लालची ज्यो विषयन के दास ।**
**धर्म-कर्म जाने नही भक्ती भाव उदास ।।**
**विषयन का विष खाकर जीवन कर लिया नाश ।**
**चढ मृत्यूशय्या पडे डाल काल गल फास ।।**

जे कामी, क्रोधी, लालची व विषयाचे दास आहे. धर्म सत्कर्म जे जाणत नाही. भक्ती भावनेबद्दल जे उदासीन आहे, म्हणजेच ज्यांच्यामध्ये भक्ती नाही भावना नाही, विषयरुपी विष खाऊन ज्यांनी आपल्या जिवनाचा नाश करून घेतलेला आहे. त्यामुळे मृत्यूशय्येवर पडून जणू त्यांनी काळाचा फास आपल्या गळयाला लावून घेतलेला आहे. असा जीव गळयात यमाचा फास लागून तो यमपुरीला दुःख भोगण्यासाठी जातो.

म्हणून अशा प्रकारे जास्तीत जास्त जीव पशूप्रमाणे मरतात. व अधोगतीला जातात. म्हणून आपली अशी अधोगती होऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी ज्ञानी उपदेश करतात...

**पशू मृत्यू से मरत है यह सारा संसार ।**
**आवागमन के चक्र मे घुमही बारंबार ।।**
**पशूमृत्यू मरना बुरा इससे मरे न कोय ।**
**देव वीर मृत्यू मरो पुनः मरन नही होय ।।**



पशू वृत्तीने जास्त जीव मरून पशुच्या गतीला जास्तीत जास्त जीव जातात. त्यामुळे ते वारंवार जन्ममृत्यूच्या चक्रामध्ये भ्रमन करत राहतात. म्हणून पशूमृत्यूने न मरता देवमृत्यू किंवा वीरमृत्यूने मृत्यू स्वीकारला पाहिजे. म्हणजे तो जन्म मृत्यूच्या चक्रापासून मुक्त होतो.

म्हणजेच कर्तव्य समजून जो धर्म, देश, रक्षणासाठी लढतो निर्बलांना सहाय्य करतो, माता, भगिनींच्या शिल रक्षणासाठी आपल्या प्राणाची आहूती देण्यासाठी जो सदैव तत्पर असतो, व जो नेहमी भगवंताचे स्मरण चिंतन करतो, तो मृत्यूनंतर मुक्त होतो.

म्हणून जन्म मृत्यूच्या चक्रापासून मुक्त व्हायचे असेल तर नेहमी भगवंताचे स्मरण चिंतन केले पाहिजे. व नेहमी म्हणजे रात्रंदिवस भगवंताचे चिंतन स्मरण करावयाचे असेल तर त्यासाठी ब्रह्ममुहूर्तात भगवंताच्या स्मरणाला, चिंतनाला सुरूवात केली पाहिजे. असे जो करतो तो तर तरतो परंतु त्यांच्या सानिध्याने अनेक जिवांचा तरणोपाय होतो. म्हणून आपण तरूण जगाला तारायचे असेल तर त्यासाठी ब्रह्म मुहूर्तात उठले पाहिजे. जसे साधू संत आपन तरूण जगाला तारतात. ते काय करतात तर ब्रह्म मुहूर्तात उठतात.

म्हणून आपन देखील ब्रह्ममुहूर्तात उठले पाहिजे. व साधूसंता प्रमाणे आपली देखील दिनचर्या असली पाहिजे. साधूसंतांची दिनचर्या कशी असते. तर साधू -संत, ऋषी -मुनी, साधक - भक्त, मुमुक्षू ब्रह्म मुहूर्तात उठतात आणि काय करतात? तर स्नान, संध्या, जप, अनुष्ठान नित्य करतात. भगवंताचे स्मरण चिंतन पूजापाठ करतात. भगवंताचे ध्यान करतात, भगवंताची आरती करतात.

## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळापासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |